ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80, Licence No. 175

वर्ष ३८ | पुणे, बुधवार, १९ एप्रिल, १९७२ | अंक ८

## समृद्ध जीवन प्राप्त करण्यासाठी बँक ऑफ महाराष्ट्र शेतकऱ्यांना मदत करते...

अधिकाधीक पोक... चांगल पीक हे तुमचं ध्येय तर त्यासाठी तुम्हाला मदत करणं हे 'बँक ऑफ महाराष्ट्र'चं ध्येय.

हे ध्येय साध्य करण्यासाठी तुम्हाला अनेक गोष्टींची जरूरी आहे. जमिनीचा कस वाढविण्याचे उपाय, सुधारीत बि-बियाणं, पाणी पुरवठ्यासाठी पंप्स्, चांगली खतं, कीटकनाशकें... अक्षरश: असंख्य गोष्टी. आणि या साऱ्यांसाठी वेळच्यावेळी पैसा हवा.

**वेळच्यावेळी पैसा देऊन महाराष्ट्र बँक तुम्हाला मदत करू शकते.**

अशा मदतीसाठी
आजच आम्हाला भेटा...

**बँक ऑफ महाराष्ट्र**
हेड-ऑफीस : ११७७, बुधवार पेठ, पुणे २




PRATIBHA 7210

## महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँकेचे नवे अध्यक्ष
### श्री. नि. श्री. सपकाळ, एम. ए., एलएल. बी.

[ बँकेचे अध्यक्ष श्री. वसंतरावदादा पाटील यांचा महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळात समावेश झाल्यानंतर ३१ मार्च १९७२ रोजी झालेल्या संचालक-मंडळाच्या सभेत बँकेचे उपाध्यक्ष श्री. नि. श्री. सपकाळ यांची अध्यक्षपदी एकमताने निवड करण्यात आली. उपाध्यक्षपदी धुळे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष श्री. पी. के. पाटील यांची निवड झाली. ]

श्री. सपकाळ यांचा जन्म अकोला जिल्ह्यात झाला. त्यांचे वडील श्री. एस. जी. सपकाळ हे त्यांच्या जमान्यातले एक सुविख्यात वकील होते आणि जुन्या मध्यप्रदेश वऱ्हाडातील ख्यातकीर्त राजकीय पुढारी होते. त्या वेळच्या मध्यप्रदेश वऱ्हाडाच्या विधान परिषदेचे ते अनेक वर्षे सदस्यही होते.

श्री. सपकाळ यांनी नागपूरच्या मॉरिस कॉलेजातून १९४६ साली पदवी संपादन केली. शाळा कॉलेजांतील जमान्यात ते हुशार विद्यार्थी म्हणून नावाजले गेले होते. १९४६ साली मॉरिस कॉलेजचा हीरक महोत्सव साजरा झाला. त्या महोत्सवाचे श्री. सपकाळ हे कार्यवाह होते. १९४८ साली ते वकिलीची परीक्षा उत्तीर्ण झाले व १९४९ साली त्यांनी एम. ए. ची पदवी संपादन केली. १९५२ साली त्यांनी अकोला येथे वकिली सुरू केली आणि अत्यंत अल्पकाळातच त्यांनी यशस्वी वकील म्हणून नाव कमावले. परंतु डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या सहवासामुळे व मार्गदर्शनामुळे त्यांची खात्री पटली की ग्रामीण जनतेची बरीचशी दुःखे आणि तिचे प्रतिगामित्व हे अज्ञान व निरक्षरतेमधून आलेले आहे. त्यामुळे शिक्षणविषयक कार्यात त्यांनी क्रियाशील भाग घ्यायला सुरुवात केली आणि ते अकोल्याच्या श्रीशिवाजी हायस्कूलचे उपाध्यक्ष म्हणून निवडले गेले. अल्पकाळातच ग्रामीण भागांत त्यांनी अनेक माध्यमिक शाळा काढल्या आणि खेड्यापाड्यांतून येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पुढील शिक्षणाची सोय करण्याच्या भावनेने प्रेरित होऊन अकोल्यास तीन महाविद्यालयांची स्थापना केली.

शेतकऱ्यांच्या मानेभोवती आवळले जाणारे सावकारी पाश आणि शेतीविषयक नवनवीन तंत्रांची कालानुसार असलेली गरज ह्या दोन गोष्टींच्या चिंतनातून श्री. सपकाळांचे लक्ष सहकाराकडे वळले. शेतकऱ्यांच्या आर्थिक गरजा भागविल्याशिवाय आणि शेतमालाला योग्य ते बाजार भाव मिळवून देण्याचे प्रयत्न झाल्याशिवाय खेड्यापाड्यांतील ग्रामीण जनतेचे दारिद्र्य जाणार नाही याची त्यांना मनोमन खात्री पटली.

१९५६ साली त्यांची अकोला जिल्हा सहकारी बँकेचे कार्यवाह म्हणून निवड झाली, तर १९५९ साली त्याच बँकेचे अध्यक्ष म्हणून ते निवडले गेले. १९६२ साली त्यांची पुन्हा एकमताने अध्यक्ष म्हणून निवड झाली. ग्रामीण जनतेच्या समस्यांची त्यांना योग्य जाणीव झालेली असल्याने व गरजू व गरीबगुरीब शेतकऱ्यांच्या व्यथांची त्यांना सुयोग्य जाण आलेली असल्याने ते १९६२ साली अकोला जिल्हा परिषदेचे अध्यक्ष म्हणून निवडले गेले. त्यांच्या कारकीर्दीत त्यांनी स्वच्छ कारभाराचा आदर्श घालून दिला व जिल्ह्याचा कायापालट घडवून आणणाऱ्या अनेक योजना कार्यान्वित केल्या. १९६७ साली प्रचंड बहुमताने ते विधान सभेवर निवडून आले. सहकार, शिक्षण, शेती आणि ग्रामीण समस्याविषयक विपुल अनुभवांमुळे शासनाला त्यांची भरपूर मदत झाली. महाराष्ट्राच्या पंचायत राज्य मूल्यमापन समितीचे ते सदस्य होते. समितीचा अहवाल तयार करताना त्यांनी इतक्या बहुमोल सूचना केल्या की, त्या कार्यवाहीत आल्या तर राज्यातील पंचायत राज्याचे चेहरेमोहरेच पालटून जातील.

सन १९५९ पासून श्री. सपकाळ महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँकेच्या संचालक मंडळाचे एक सदस्य असून १९७१ सालापासून ते बँकेचे उपाध्यक्ष होते. नागपूर विभागीय बोर्डाचे ते तीन वर्षे अध्यक्ष होते, १९५९ पासून ते विदर्भ को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग सोसायटीचे संचालक होते. १९७२ सालच्या नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत ते ३७,००० मतांनी विधान सभेवर निवडून आले, त्यांच्या सर्व विरोधकांच्या अनामत रकमाही जप्त झाल्या. ते अकोला जिल्हा स्पिनिंग मिल्सचेही अध्यक्ष आहेत.

---

### मोफत पास देऊन कर चुकविण्याची क्लृप्ती

कर चुकविण्याच्या अनेक पद्धती प्रचलित आहेत. सोडतीत बक्षिसे लागलेली तिकिटे विकत घेऊन कर चुकवून मिळविलेला काळा पैसा पांढरा करता येतो. अशीच आणखी एक क्लृप्ती म्हणजे मनोरंजनाच्या कार्यक्रमाची तिकिटे मोफत देणे. मद्रासमधील एका सिनेमागृहाला कर वसूल करणाऱ्या अधिकाऱ्यांनी खेळ चालू असता अचानक भेट दिली आणि प्रेक्षकांची तिकिटे तपासली तेव्हा असे आढळून आले की, प्रेक्षकांपैकी ९० टक्के प्रेक्षकांजवळ कॉम्प्लिमेंटरी पास होते. सिनेमागृहात ४०० प्रेक्षक होते, त्यांपैकी फक्त ४० जणांजवळच रीतसर तिकिटे होती. साउथ इंडियन फिल्म चेंबर ऑफ कॉमर्सने ह्या मार्गाबद्दल तक्रार केलेली आहे. आणि गंमत म्हणजे कॉम्प्लिमेंटरी म्हणून दिलेले सर्व पासेस तिकिटे विकण्याच्या खिडकीवर राजरोस देण्यात आलेले होते.

---

### दिल्ली कॉलेजला जिनांच्या देणगीचा लाभ

पाकिस्तानचे निर्माते मरहूम जिना ह्यांनी अरेबिक कॉलेजला आपल्या मृत्युपत्राप्रमाणे २५ हजार रुपयांची देणगी दिलेली होती. आता ही देणगी दिल्ली कॉलेजला देण्यात येणार आहे मुंबई हायकोर्टाचे न्यायमूर्ती मि. नथवानी ह्यांनी दिलेल्या निकालपत्राप्रमाणे ही रक्कम अरेबिक कॉलेजचे वारस म्हणून दिल्ली कॉलेजला देण्यात येईल. जिनांनी हे मृत्युपत्र पाकिस्तानच्या निर्मितीपूर्वी ८ वर्षे केलेले आहे.

☆ अर्थ ☆

बुधवार, १९ एप्रिल, १९७२



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.*

## शेतीच्या उत्पन्नावर कर बसविण्याची सक्ती करा

श्री. एन. ए. पालखीवाला ह्यांनी मद्रास येथे बोलताना भारत सरकारच्या १९७२-७३ सालच्या अंदाजपत्रकावर आपले विचार व्यक्त केले. ते म्हणाले की, कर बसविण्याच्या कामी सध्या शेतीपासून मिळणारे उत्पन्न आणि बिगरशेतीचे उत्पन्न ह्यांच्याबाबत अन्याय्य पक्षपात दाखविला जात आहे. हा पक्षपात थांबविणे अतिशय अगत्याचे आहे. शेती व बिगरशेती व्यवसाय–धंद्यापासून मिळणारे सध्याचे सालीना उत्पन्न प्रत्येकी सुमारे १६ हजार कोटी रुपये आहे. राज्यांकडून वसूल होणाऱ्या शेतीवरील कराचे उत्पन्न अवघे १३ कोटी रुपये आहे; तर बिगरशेतीच्या उत्पन्नापासून मिळणाऱ्या कराचे उत्पन्न १०३० कोटी रुपये आहे. हे आकडे १९७२-७३ सालातील आहेत. भारताच्या लोकसभेमध्ये आणि राज्य विधिमंडळातून शेतीच्या व्यवसायाची कड घेऊन बाजू मांडणारे गट आहेत. त्यांच्या दडपणामुळे शहरातील लोकांवर होणाऱ्या अन्यायाचे परिमार्जन होणे अवघड झालेले आहे. मध्यवर्ती सरकारने राज्यांना देण्यात येणाऱ्या अनुदानाच्या रकमा बंद कराव्या, म्हणजे त्यांना शेतीपासून मिळणाऱ्या उत्पन्नावर प्राप्तिकर बसविणे भाग पडेल. दुसरा असा एक मार्ग सुचविता येईल. आता मध्यवर्ती सरकार आणि राज्य सरकारे ह्यांच्यात एकच पक्ष अधिकारावर आला आहे. राज्य सरकारांनी घटनेच्या २५२ व्या कलमाखाली मध्यवर्ती सरकारला शेतीच्या उत्पन्नावर प्राप्तिकर बसविण्याचा अधिकार देणारे ठराव मंजूर करावे. म्हणजे असा कर बसविण्याच्या मार्गातील घटनात्मक अडथळा दूर होईल, आणि मध्यवर्ती सरकारला जरूर ती कायदेशीर तरतूद करता येईल.

अंदाजपत्रक ज्या हेतूने सादर करण्यात आले आहे ते हेतू साध्य होणार नाहीत. नियोजन समितीने बचत करण्याची जी उद्दिष्टे ठरविलेली आहेत ती गाठण्यात येतील असे वाटत नाही. त्याचप्रमाणे गुंतवणुकीत ठरविलेली वाढ होईल आणि औद्योगिक प्रगती होईल अशीही आशा वाटत नाही. भारतात व्यक्तिगत उत्पन्नावर फार जबर कर बसविण्यात आलेला आहे. जगात कोठेही इतका कर घेण्यात येत नाही. त्याचप्रमाणे कंपन्यांवरही फार मोठा करभार लादण्यात आला आहे. परिणामी बचत करण्यासाठी लोकांजवळ पैसाच राहात नाही आणि कर चुकविण्याची वृत्ती बळावत जाते. राजकीय पक्षांना ज्या देणग्या मिळतात त्या जाहीर करण्याची सक्ती करण्यात आली पाहिजे. विशेषतः रोख देणग्या तरी जाहीर करण्यात आल्या पाहिजेत आणि असे न करण्याबद्दल जबर शिक्षेचीही व्यवस्था झाली पाहिजे. कंपन्यांवरील करांचा बोजा फार घातक ठरला आहे. त्यामुळे कंपन्यांकडून होणाऱ्या बचतीत खूप घट झाली आहे. दहा वर्षांपूर्वी त्यांच्या बचतीचा दर ८ ते ९ टक्के होता. तो आता ५½ टक्के इतका खाली आला आहे. नियोजन समितीला औद्योगिक वाढीचा वेग १० टक्क्यांइतका हवा आहे. हा वेग १२ टक्क्यांपर्यंतसुद्धा वाढविता येणे शक्य आहे. मात्र त्यासाठी योग्य ती आर्थिक प्रलोभने दाखविण्यात आली पाहिजेत. परंतु अंदाजपत्रकावरून असे दिसते की, खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांना भांडवलाचा संचय करणे अशक्य करून पैशासाठी त्यांना सरकारी नियंत्रणाखालील वित्तीय संस्थांकडे जाणे भाग पडावे असा सरकारचा उद्देश आहे. परंतु भांडवल संचयासाठीच विकास आवश्यक आहे इकडे लक्ष दिले जात नाही.

## नवी अमेरिकन विमाने न घेण्याचा सल्ला

इंडिअन एअर लाइन्स कंपनीने वाहतुकीसाठी आणखी ७ बोइंग ७३७ विमाने घेण्याचे ठरविले होते, परंतु भारत सरकारने आता ती न घेण्याचा सल्ला कंपनीला दिला आहे. त्याऐवजी युरोपीय देशांकडून विमाने घेण्याच्या खटपटीत आता कंपनी गुंतली आहे. बांगला देशावरून भारत व अमेरिका ह्यांचे संबंध बिघडलेले असल्याने अमेरिकेने भारताला देण्यात येणारी आर्थिक मदत स्थगित केली हे लक्षात घेऊन भारत सरकारने विमाने न घेण्याचा सल्ला दिला असावा. मध्यम पल्ल्याची विमाने विकत घेण्याचा प्रश्न अमेरिकन मदतीशी निगडित असल्यामुळे अमेरिकेकडून नवीन विमाने घेण्याचे बंधन आता भारतावर राहिलेले नाही, अशी सरकारची धारणा आहे. सध्या इंडियन एअर लाइन्सजवळ बोइंग ७३७ ह्या प्रकारची सात विमाने आहेत त्यांना लागणाऱ्या सुट्या भागांचीही खरेदी बिगरअमेरिकन बाजारपेठांतून करावी असे सुचविण्यात आलेले आहे. विमानांची खरेदी थांबविणे कायदेशीर रीत्या सोपे मात्र नाही. लवकरच मिळणाऱ्या दोन विमानांची मागणी रद्द करण्याचा प्रयत्न कंपनीकडून करण्यात आला, परंतु करार रद्द केल्यास दंडादाखल द्यावयाच्या रकमेसंबंधीच्या कलमावर बोट ठेवून अमेरिकन कंपन्या स्वस्थ आहेत. ह्या कलमातील अटीप्रमाणे रद्द केलेल्या प्रत्येक विमानामागे एअर इंडियाला ५ कोटी रुपये द्यावे लागतील. बोइंग ७३७ विमानाची किंमतच मुळी प्रत्येकी ९ कोटी रुपये आहे. अशा परिस्थितीत मागण्या रद्द करून अमेरिकन कंपन्यांना दंडाची रक्कम भरावयाची की ठरल्याप्रमाणे विमाने घ्यावयाची, असा प्रश्न उत्पन्न झाला आहे. भारत-अमेरिका राजकीय संबंध सुधारण्यावर बरेच अवलंबून आहे.

## कोलार सोन्याच्या खाणी चालविण्यासाठी नवी कंपनी

कोलार येथील सोन्याच्या खाणी चालविण्याचे काम आतापर्यंत मध्यवर्ती सरकारचे खाते करीत होते. आता ह्या खाणी चालविण्याचे काम सार्वजनिक विभागातील एका नव्या कंपनीकडे देण्यात आले आहे. कंपनीचे नाव भारत गोल्ड माइन्स लि. असे आहे. नवीन कंपनी खाणी अधिक कार्यक्षमतेने चालवील अशी अपेक्षा करण्यात येत आहे. १० वर्षापूर्वी ह्या खाणींचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले होते तेव्हापासून खाणींचे उत्पादन घटत चालले होते आणि खर्च जास्त वाढत चालला होता. उत्पादन कमी होण्यास काही नैसर्गिक कारणेही घडून आली. काही वेळा खाणीतील खडक कोसळले, काही वेळा आगी लागल्या, तर काही वेळा खूप पाऊस पडल्यामुळे आत पाणीच पाणी झाले. सोन्याच्या खनिजापासून मिळणाऱ्या सोन्यातही एकसारखी घट झालेली दिसून येते. त्यावरून ह्या खनिजाची प्रतही घसरत चालली असावी असे दिसते. १९६३-६४ सालात एक टन खनिजापासून ६·६९ ग्रॅम्स सोने मिळू शकत होते. १९७०-७१ साली हे उत्पादन ५·८६ ग्रॅम्सपर्यंत खाली आलेले दिसले. १९६४-६५ साली एकूण उत्पादन ३८·४६ लाख ग्रॅम झाले होते ते १९७०-७१ साली २१·७८ ग्रॅमपर्यंत खाली आले आहे. सोन्याचे सर्व उत्पादन सरकार आंतरराष्ट्रीय किंमतीने विकत घेत असे. ही किंमत १० ग्रॅम्सना ८४·४० रुपये इतकी आहे. खुल्या बाजारात सोने ज्या भावाने विकले जाते त्या किंमतीपेक्षा ही किंमत निम्म्यापेक्षाही कमी आहे. नवीन कंपनीही वरील दरानेच सरकारला सोने देणार आहे. येत्या दोन वर्षात नवी कंपनी चालविण्यास मदत व्हावी म्हणून सरकार ८·२५ कोटी रुपयांची मदत देणार आहे.

---

## पाकिस्तानच्या कापडाला ब्रिटनमध्ये बंदी

पाकिस्तानच्या सुती कापड गिरण्यांच्या संघटनेने पाकिस्तानातील कापड ब्रिटनला निर्यात करण्याविषयी एक करार करण्याची सूचना केली होती. परंतु ब्रिटनने ह्या सूचनेला नकार दिला असून पाकिस्तानच्या कापडावरील आयातबंदी चालू ठेवण्याचे ठरविले आहे. बांगला देशला ब्रिटनने मान्यता दिल्यावर पाकिस्तानने इतर अनेक देशांप्रमाणेच ब्रिटनशी राजनैतिक संबंध तोडले होते. त्यामुळे राष्ट्रकुटुंबातील देशांना मिळणाऱ्या व्यापारी सवलतींना पाकिस्तान मुकले होते. बांगला देश स्वतंत्र झाल्यामुळे पाकिस्तानला ताग व चहा ह्यांच्या निर्यातीमुळे होणारी परदेशीय चलनाची प्राप्ती थांबली आहे. ब्रिटनला होणारी कापडाची निर्यातही बंद झाल्यास पाकिस्तानच्या कापड गिरण्या मोठ्या संकटात सापडतील.

---




तापल्या
लोखंडावर
घाव घाला...

या म्हणीची व्याप्ती फार मोठी आहे. पैशाचेच उदाहरण घ्या. नुसता मुबलक पैसा असून उपयोगी नाही. उत्पादनक्षम उद्योगधंद्याची यशस्वीता पैशाची वेळेवर तरतूद होण्यावर अवलंबून आहे. तसेच लघुउद्योगधंदा करणारास अगर स्वतःचा धंदा असणाऱ्या कारागीरास आपल्या तांत्रिक ज्ञानाबरोबरच तज्ञाकडून आर्थिक बाबींसंबंधीहि कळकळीच्या मार्गदर्शनाची आवश्यकता आहे. याची जाणीव होते.

यांसाठी बँक ऑफ इंडीयाच्या नजिकच्या शाखेत विचारणा का करीत नाहीं ?

बँक ऑफ इंडिया

RAAS/2/127 6MAR

### बांगला देशासाठी चलनी नोटांची छपाई

नाशिक येथील चलनी नोटा छापण्याच्या कारखान्यात बांगला देशासाठी चलनी नोटा छापण्यात येत आहेत. त्यामुळे छापखान्यावर खूप ताण पडला आहे आणि भारतासाठी छापावयाच्या चलनी नोटा छापण्याच्या कामी दिरंगाई होऊ लागली आहे. बांगला देशाला निरनिराळ्या रकमांच्या ३०० कोटी रुपयांच्या एकूण नोटांची आवश्यकता आहे. कारखान्यावर पडलेला ताण लक्षात घेऊन बांगला देशासाठी आणखी नोटा छापण्याचे काम सरकारने अंगावर न घेण्याचे ठरविले आहे. बांगला देशाला लागणाऱ्या चलनी नोटांची गरज ३०० कोटी रुपयांच्या नोटांपेक्षा बरीच अधिक आहे. पाकिस्तानी लष्कराने बांगला देशातून माघार घेतांना मालमत्तेची मोठ्या प्रमाणावर नासधूस केली. त्याचबरोबर लष्कराने प्रचारात असलेल्या चलनी नोटाही फार मोठ्या प्रमाणावर नष्ट करून टाकल्या. साहजिकच बांगला देश स्वतंत्र झाल्यावर तेथे आर्थिक व्यवहारांच्या साधनांची म्हणजेच नोटांची खूपच टंचाई उत्पन्न झाली. स्वातंत्र्य-प्राती नंतर काही काळ पाकिस्तानच्या जुन्याच नोटा व्यवहारात ठेवण्याशिवाय मार्गही नव्हता. बांगला देशाचे सरकार ब्रिटनमध्ये नोटा छापून घेण्याची खटपट करीत आहे. भारताने छापून दिलेल्या नोटा बांगला देशात आता चालू करण्यात आल्या आहेत. येत्या मे अगर जूनअखेर भारतात छापलेल्या नोटांचा शेवटचा हप्ता बांगला देशाला देण्यात येईल. ह्या नोटा छापण्यासाठी सुमारे १·१० कोटी रुपये खर्च आला. भारताने बांगला देशाला मदत म्हणून २५ कोटी रुपयांची देणगी जाहीर केलेली आहे. ह्या देणगीतून नोटा छापण्याचा खर्च वळता करून घेण्यात येणार आहे.

---

### अमेरिकेची जागा घेण्यास जपान तयार

जपानचे भारतामधील वकील मि. टैसाकू कोजिमा ह्यांनी एका मुलाखतीत असे जाहीर केले आहे की अमेरिकेकडून भारताला मिळणाऱ्या आर्थिक आणि तांत्रिक मदतीत बरीच कपात करण्यात आली आहे. मदतीत पडलेला खंड भरून काढण्याची जपानची तयारी आहे. पण त्यासाठी भारताकडून पाऊल उचलले गेले पाहिजे. मुलाखतीत ते पुढे म्हणाले की जपान आणि भारत फार दीर्घ काळापर्यंत आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक क्षेत्रात पाश्चिमात्य देशांवर सर्वस्वी अवलंबून राहिले. ह्या प्रदीर्घ कालखंडात दोन्ही देश पाश्चात्य संस्कृती आत्मसात करण्यात गढून गेले होते. परंतु ह्यामधील चूक आता त्यांनी लक्षात घेतली पाहिजे. पाश्चात्य संस्कृतीच्या वर्चस्वामुळे जपान व भारत परस्परांतील जुने संबंधही विसरून गेले आणि पाश्चात्य संस्कृतीमुळे होणाऱ्या बदलामागे धावत गेले. केवळ एक हजार वर्षांपूर्वी जपानला फक्त दोनच देश माहीत होते ते म्हणजे भारत व चीन. पण नंतर पाश्चिमात्य संस्कृतीचे वारे जोराने वाहू लागले आणि उभय देशांना शेजारच्या देशाचाही विसर पडला. भारताचे परराष्ट्रीय धोरणही ह्याच दिशेने आखण्यात आले. त्याचा परिणाम आता बांगलाच स्पष्ट झाला आहे. जपान तर इतका वाहवला की भारताने जपानला त्याचा धर्म दिला ह्याचीही त्याला विस्मृती झाली. मानवी जीवनाच्या आर्थिक, तांत्रिक, शास्त्रीय, इत्यादी सर्व क्षेत्रांत भारताशी सहकार्य करण्यास कितपत वाव आहे ह्याची पाहणी करण्यात आली पाहिजे. उभयता देशात अधिकाधिक व्यापार झाला पाहिजे. त्याचप्रमाणे त्यांचे सांस्कृतिक संबंधही वाढविण्यात आले पाहिजेत. आंतरराष्ट्रीय संबंधात भारताचा महत्त्वाचा मित्र व भागीदार होण्याची जपानची इच्छा आहे.

---

### नद्यांच्या पाण्यावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न

हिंदमध्ये अलीकडे गव्हासारख्या पिकाबाबत हरितक्रांती झालेली असली तरी शेतीला हुकमी पाणी पुरवण्याचा प्रश्न अद्याप समाधानकारक रीतीने सुटलेला नाही. नद्यांच्या पाण्याचा जास्तीत जास्त उपयोग करून घेण्यासाठी लागणारे तंत्रज्ञान आता उपलब्ध आहे. काही उणीव असलीच तर ती परदेशी तंत्रज्ञांच्या साह्याने भरून काढता येण्यासारखी आहे. खरा प्रश्न आहे तो निरनिराळ्या राज्यांतून वाहणाऱ्या नद्यांच्या पाण्याचा उपयोग करून घ्यावयासाठी लागणाऱ्या प्रभावी यंत्रणेचा. स्वातंत्र्योत्तर काळात नद्यांच्या पाण्याच्या वाटपावरून अनेक राज्यांत तेढ उत्पन्न झाली आणि त्यामुळे अनेक पाणीपुरवठ्याच्या योजना सुरू सुद्धा झाल्या नाहीत. भारत सरकार ह्या परिस्थितीवर उपाय शोधण्याच्या दृष्टीने आपल्या कायदा खात्याशी विचारविनिमय करीत आहे. ह्यासंबंधी सल्ला देणाऱ्या लोकसभेच्या समितीपुढे डॉ. राव म्हणाले की काही पाणीपुरवठा व वीजनिर्मिती योजना अशा आहेत की त्या कार्यवाहीत आणण्यासाठी निरनिराळ्या राज्यांच्या मुख्यमंत्र्यांचे एकमत असणे आवश्यक आहे. त्यासाठी राज्यांच्या मुख्य मंत्र्यांची एक बैठक लवकरच बोलावण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे राज्यांच्या पाणीपुरवठा मंत्र्यांशी चर्चा करून नद्यांच्या पाण्याच्या वाटपाचे अधिकार मध्यवर्ती सरकारला देण्याबाबत विचार होणार आहे. नद्यांच्या पाण्याच्या वाटपाचे प्रश्न कसे सोडवावे ह्यासंबंधी अनेक पर्यायी उपायांचा विचार करण्यात येत आहे. लवादामार्फत पाणीवाटपाचे तंटे सोडविण्याची पद्धत कालहरण करणारी आहे. वाटाघाटींनीही तंटे लवकर सुटत नाहीत असा अनुभव आलेला आहे.

---

### पोलादाच्या किंमतीपैकी २५% किंमत जकातीमुळेच

मार्च १९६४ मध्ये पोलादाची विक्रीची किंमत टनास ६६१ रु. होती ती आता ११५२·५ रु. झाली आहे. आठ वर्षांपूर्वी, विक्रीच्या किंमतीत जकातीचा भाग फक्त १३·८% होता; आता तो २४·९% आहे.

## हॉटेल-महर्षी मोहनसिंग ओबेराय

राज्य सभेवर निवडून गेलेले श्री. मोहनसिंग ओबेराय हे ७२ वर्षांचे असून भारताच्या हॉटेलच्या धंद्याचे महर्षी गणले जातात. आर्थिक अडचणीमुळे त्यांना कॉलेजचे शिक्षण घेता आले नाही. त्यांच्या खेड्यागावात ( आता ते प. पाकिस्तानात समाविष्ट आहे. ) प्लेगचा प्रादुर्भाव झाल्यामुळे त्यांना आपल्या नूतन परिणित पत्नीबरोबर गाव सोडावे लागले. ते सिमल्याला गेले आणि तेथील सुप्रसिद्ध सेसिल हॉटेलमध्ये ४५ रुपये पगारावर कारकुनी करू लागले. तेथे ते फ्लेटी आणि क्लार्क्स ह्या हॉटेलांसाठीही काम करू लागले. आता सेसिल आणि क्लार्क्स ही दोन्ही हॉटेले ओबेरायांच्या साम्राज्यात समाविष्ट झाली आहेत.

१९३३ मध्ये कॉलऱ्यामुळे कलकत्ता येथील ग्रँड हॉटेलमधील सुमारे १०० परदेशी उतारू मरण पावले. हॉटेल बंद पडले. लिक्विडेटरने 'गुडविल' साठी मागणी केली, तिला हॉटेलनेच 'बॅडविल' साठी रक्कम द्यावी असा ओबेरायने उलट डाव टाकला आणि त्यांनी सौदा पटवला. ओबेरायनी जुनी नामवंत हॉटेले खरेदी केली, काही नवीन बांधली. त्यांनी बांधलेले पहिले हॉटेल म्हणजे गोपाळपुर-ऑन-सी चे. त्यांचे अगदी नवीन हॉटेल म्हणजे मुंबईमधील ओबेराय-शेरेटन हे होय. ते येत्या सप्टेंबरमध्ये सुरू होईल. त्यांच्या साम्राज्यात सध्या भारतातील सात, सिंगापूर येथील ओबेराय इंपीरिअल आणि खाटमांडू येथील सोल्टी-ओबेराय ह्या अलिशान हॉटेलांचा समावेश आहे. सिलोनमध्ये एक नवे हॉटेल लवकर उभारले जाईल.

"दीर्घ परिश्रमाचे मला फळ मिळत आहे; पण सचोटी, मित्रांचे सहाय आणि नशिबाचा भाग ह्यांचीही मदत मला झाली" असे ओबेराय नम्रतेने म्हणतात.

---

## मलेशियात तीन किर्लोस्कर कारखान्यांचा मिळून उपक्रम

बंगलोरची किर्लोस्कर इलेक्ट्रिक, पुण्याची ऑइल एंजिन्स आणि किर्लोस्करवाडीची किर्लोस्कर ब्रदर्स या तीन कंपन्यांनी मिळून मलेशियात शहा अलम इंडस्ट्रिअल एस्टेटमध्ये मलेशियाच्या सहकार्याने नवा कारखाना उभारला आहे. त्याचे उद्घाटन नुकतेच झाले. इलेक्ट्रिक मोटर्स, अल्टर्नेटर्स, स्ल्यूस व्हॉल्वज्, सेंट्रिफ्युगल पंप, डीझेल एंजिन्स, इत्यादींचे उत्पादन ह्या कारखान्यात होईल. १८ लक्ष मलेशिअन डॉलर्स भांडवलापैकी २०% भांडवल मलेशिअन को. इन्शुअरन्स सोसायटीने गुंतविले आहे. कारखान्यातील यंत्रसामग्रीपैकी ८०% यंत्रसामग्री भारतीय बनावटीची आहे, बाकीची जपान आणि अमेरिका येथून मागविलेली आहे. सध्या कारखान्यात ५० कामगार आहेत. ते हळूहळू वाढून ४०० ते ५०० पर्यंत जातील. तूर्त बंगालोरचे पाच तंत्रज्ञ येथे काम करीत आहेत. फिलिपाइन्स आणि सिलोन येथेही किर्लोस्करांचे संयुक्त उपक्रम कार्यवाहीत आहेत. पश्चिम जर्मनीत किर्लोस्कर ऑइल एंजिन्सची एक उप-कंपनी आहे.

## हिंद-बांगला देश नद्यांविषयी संयुक्त मंडळ

हिंद आणि बांगला देश ह्यांनी एक नदीमंडळ स्थापन करण्याचा विचार चालविला आहे. हे मंडळ दोन्ही देशांत नद्यांना येणाऱ्या महापुरांचे नियंत्रण करणे आणि समान पाणीपुरवठा योजना तयार करणे ह्याविषयी पाहणी करील. त्याशिवाय उभयता देशांतील वीजपुरवठा योजना एकमेकांशी जोडण्याचाही विचार करील. हिंद सरकारच्या पाणीपुरवठा व वीज उत्पादन खात्याच्या ताज्या अहवालात ही माहिती देण्यात आली आहे. नदीमंडळाची रूपरेखा तयार करण्यात आली आहे. मंडळावर दोन्ही देशांचे तज्ज्ञ असतील. दोन्ही देशांतून वाहणाऱ्या नद्यांची पाहणी करून त्यांचे पाणी उभयतांना उपयुक्त ठरेल अशा रीतीने करण्याची पद्धतही मंडळ सुचवील. पुरांची आगाऊ इशारा देण्यासाठी काय यंत्रणा स्थापन करावी ह्याचाही विचार मंडळ करील.

---

## भारताच्या मंडपाला सुवर्णपदक

गेल्या महिन्यात कैरो येथे एक आंतरराष्ट्रीय व्यापारी प्रदर्शन भरविण्यात आले होते. ह्या प्रदर्शनात भारतानेही आपल्या मालाचा एक मंडप उभारला होता. मंडपाच्या आकर्षक उभारणीबद्दल भारताला सुवर्णपदक देण्यात आले. मंडपात अनेक उद्योगधंद्यांनी आपला माल मांडला होता. त्यांत मुख्यतः हलक्या व अवजड एंजिनिअरिंगच्या धंद्याचा माल होता. गेल्या १० वर्षांत भारत आणि इजिप्त ह्यांच्यामधील व्यापार बराच वाढलेला आहे. १९६६-६७ साली भारताने इजिप्तला २६·७८ कोटी रुपये किंमतीचा माल निर्यात केला होता. १९६९-७० साली ३४·६३ कोटी रुपये किंमतीचा आणि १९७०-७१ साली ३६·३७ कोटी रुपये किंमतीचा माल निर्यात करण्यात आला. इजिप्तकडून आयात करण्यात येणाऱ्या मालाची किंमतही वाढत चाललेली आहे.

---

## युद्धगुन्हेगारांवरील खटल्यांना पाठिंबा

बांगला देशातील दडपशाहीत भाग घेणाऱ्या ज्या पाकिस्तानी सैनिकांनी मानवतेविरुद्ध गुन्हे केलेले असतील त्यांच्यावर खटले भरण्यात यावेत आणि निःपक्षपाती न्यायासनासमोर आरोप सिद्ध झाल्यास त्यांना शिक्षाही देण्यात आल्या पाहिजेत असे मत कराची येथे प्रसिद्ध होणाऱ्या 'डॉन' ह्या वृत्तपत्राने आपल्या एका अग्रलेखात व्यक्त केले आहे. बांगला देशातील हत्याकांडात निःशस्त्र नागरिकांची मोठ्या प्रमाणावर कत्तल करण्यात आली, विरोध करणारी खेडीच्या खेडी जाळून टाकण्यात आली आणि हजारो स्त्रियांवर बलात्कार करण्यात येऊन नंतर त्यांना मारून टाकण्यात आले अशी कबुलीही ह्या वृत्तपत्राने दिली आहे. पाकिस्तानातील वृत्तपत्रांत अशी भूमिका अद्याप कोणी घेतलेली नाही.

## बँकांच्या भोवतालचे वलय वाढविले पाहिजे
### क्लिअरिंगच्या अडचणी, रिटर्न्सची संख्या कमी करण्याचा प्रयत्न

गेल्या दोन वर्षांत भारतीय बँकांची जेवढी वाढ झाली, तेवढी जगात कुठेही झालेली नाही. कित्येक नवे व्यवहार सुरू करण्यात आले, त्यासाठी कारभाराची सुसंगत व्यवस्था झालेली नव्हती; तयारीपेक्षा उत्साहच अधिक होता. शाखांची संख्यावाढ, ठेवींची वाढ आणि नव्या प्रकारच्या कर्जांची वाढ ह्यांमुळे बँकांभोवती नवे वलय निर्माण झाले आहे. ते वलय वाढविण्यासाठी आधुनिक पायावर बँकिंगची उभारणी करायला हवी; मनुष्यबळाला प्रशिक्षण देऊन त्याची योजनाबद्ध सुधारणा करायला हवी.

बँकिंगमधील अंधाराची जागा म्हणजे बऱ्यापैकी पगार मिळणारे कर्मचारी; ती एक डोकेदुखीच आहे. सर्व बँकांचे सर्व काम चालू आहे, असे क्वचितच घडते. क्लिअरिंगचे सर्व काम झाले आहे असा एकादाही दिवस नसतो. बँकांकडून सेवेबाबत जनतेच्या अपेक्षा पुऱ्या करण्याच्या दृष्टीने ह्या प्रश्नाचे महत्त्व जाणायला हवे.

ठेवीतील वाढीच्या मानाने कर्जे जास्त वाढली आहेत. ही परिस्थिती थोडी सुधारत आहे. रिझर्व्ह बँकेकडून कर्ज घेणे ही एक उपलब्ध सोय आहे; नित्याचा मार्ग नव्हे. त्या सोयीचा फायदा तात्पुरता घ्यावयाचा आहे; वर्षभर चालू ठेवण्याचा नाही.

बँकेतील शाखांच्या हिशेबांचे रीकन्सिलिएशन लवकर लवकर पुरे केले जाणे आगत्याचे आहे. शाखांकडून मागविण्यात येणाऱ्या रिटर्न्सची संख्या कमी करण्याचा प्रयत्न करायला हवा. रिटर्न्सची संख्या वाढविण्यास रिझर्व्ह बँकच कारणीभूत आहे, हे मान्य आहे. ही रिटर्न्स कमी कशी करता येतील ह्याचा रिझर्व्ह बँक विचार करीत आहे.

( रिझर्व्ह बँकेचे डेप्युटी गव्हर्नर डॉ. आर. के. हजारी ह्यांचे इंडियन बँक्स असोसिएशनच्या वार्षिक सभेतील भाषण )

---

## एल. आय. सी. च्या कामात २७% वाढ

लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशनने ३१ मार्च, १९७२ अखेरच्या वर्षी १६४२ कोटी रुपयांचे विमे उतरविले. १९७०-७१ मध्ये कार्पोरेशनने १२९५ कोटी रुपयांचे विमे उतरविले होते. म्हणजे नव्या कामात २७% वाढ झाली. चालू वर्षी २१५० कोटी रुपयांचे काम पुरे करण्याचे लक्ष्य कॉर्पोरेशनने ठरविले आहे. ग्रामीण भागात नवे काम मिळविण्याकडे विशेष लक्ष दिले जाईल.

---

## सिंधमधून येणारे निर्वासित

पाकिस्तानच्या सिंध प्रांतातून भारतात येणाऱ्या निर्वासितांची संख्या वाढत चालली आहे. आतापर्यंत सुमारे १,५०० निर्वासितांनी पाकिस्तानी अधिकाऱ्यांच्या छळाला कंटाळून भारतात आश्रय घेतला आहे. हे निर्वासित रजपुतांपैकी एका पोटजातीचे आहेत. सिंधमधील आपली सर्व मालमत्ता सोडून देऊन त्यांना यावे लागले आहे.

## 'स्वस्तिकचे' १२ % डिव्हिडंड कायम

स्वस्तिक रबर प्रॉडक्ट्स लि.ने इक्विटी शेअर्सवर १२% आणि प्रेफरन्स शेअर्सवर ९% व ९.५% डिव्हिडंड १९७१ सालासाठी कायम ठेवण्याची शिफारस संचालक मंडळाने केली आहे.

१९७० मध्ये कंपनीची विक्री ६.०४ कोटी रु. ची झाली होती; १९७१ मध्ये ती ७.३७ कोटी रु. ची झाली. २९,०२,२१९ रु. ची घसाऱ्याची तरतूद करून करपूर्व नफा ३०,५३,७९२ रु. राहिला. गेल्या वर्षी तो २२.१८ लक्ष रु. होता.

मॉरिशसमधील कंपनीची जोड कंपनी — आय. जी. एम. इंडस्ट्रीज प्रा. लि — हिच्या कारखाना-उभारणीचे काम योजनेप्रमाणे चालू आहे. स्वस्तिकने आवश्यक ती यंत्रसामग्री आणि तंत्रज्ञ अहवालाच्या वर्षी पुरविले आहेत. एक-दोन महिन्यांत उत्पादनास प्रारंभ होईल.

दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. चे 'स्वस्तिक' मध्ये ३१ डिसेंबर, १९७१ रोजी कायदेशीर विलिनीकरण झाले. त्यामुळे 'स्वस्तिक' च्या भागधारकांत नव्या ९,००० भागधारकांची भर पडली आहे आणि 'स्वस्तिक' चा भांडवलाचा पाया विस्तारला आहे.

भारत-पाक युद्धामुळे कंपनीला संरक्षण खात्याच्या तातडीच्या गरजांस प्राधान्य द्यावे लागल्यामुळे निर्यातीचे लक्ष्य गाठता आले नाही. १९७० च्या मानाने १९७१ मध्ये कंपनीने संरक्षणविषयक मालाचे उत्पादन तिपटीएवढे केले. त्याची तातडी आणि महत्त्व लक्षात घेऊन कंपनीने किमतीसाठी ओढाताण न करता ऑर्डरी स्वीकारल्या. त्याचा कंपनीच्या किफायतशीरपणावर प्रतिकूल परिणाम झाला. कच्च्या मालाच्या किमतीही बऱ्याच वाढल्या. ह्या दोन्ही गोष्टी मागील वार्षिक सभेच्या वेळी अपेक्षित नव्हत्या.

मुख्यत: सरकारी आणि संरक्षणविषयक ऑर्डरीमुळे कंपनीची उलाढाल वाढली. १९७२ चे वर्ष अधिक चांगले जाईल अशी अपेक्षा आहे.

---

## हवाई प्रवासी चोरटी शस्त्रेही जवळ बाळगतात

विमानाने प्रवास करणाऱ्यात हवाई चाचे असले तर त्यांना खाली उतरविण्यासाठी प्रवाशांची कडक तपासणी सर्वत्र विमानतळावर करण्यात येते. ह्या तपासणीत अनेक बेकायदेशीरपणे नेण्यात येणाऱ्या वस्तू आढळतात. झ्यूरिक येथील आंतरराष्ट्रीय विमानतळावर करण्यात आलेल्या अशा तपासणीचा अहवाल पोलिसांनी तयार केला आहे. त्यावरून असे दिसते की प्रवासी कोणत्या तरी कारणासाठी अगर कधी कधी कारणविरहित अनेक शस्त्रे चोरून जवळ बाळगतात. ऑक्टोबर १९७० ते डिसेंबर १९७१ पर्यंतच्या तपासणीत ३७९ पिस्तुले व रिव्हॉल्व्हर्स, पाती झटकन बाहेर येणारे ४,३२६ चाकू, सुऱ्या व इतर धोकादायक शस्त्रे प्रवाशांजवळ सापडली ती सर्व जप्त करण्यात आली.

## खताच्या कारखान्यासाठी देशी यंत्रसामग्री

परदेशाकडून मिळणाऱ्या मदतीबाबतची अनिश्चितता भारत-पाक युद्धानंतर वाढलेली आहे. अशा परिस्थितीत सर्वत्र उत्पादन क्षेत्रात स्वावलंबी बनण्याचे प्रयत्न चालू आहेत. भारतामधील रासायनिक खताच्या उत्पादनासंबंधी दिल्ली येथे परिसंवाद भरविण्यात आला होता. त्यात व्यक्त झालेल्या विचारांत स्वावलंबनाच्या प्रयत्नाचे स्वरूप दिसून येते. परिसंवाद फर्टिलायझर असोसिएशन ऑफ इंडिया ह्या संघटनेने आयोजित केला होता. देशात उभारण्यात आलेल्या खतांच्या कारखान्यांची पूर्ण उत्पादनक्षमता का वापरली जात नाही याची चोकशी करण्यासाठी नियोजन समिती एक अभ्यासगट स्थापन केला होता. अभ्यासगटाच्या अहवालाचा विचार करून खतांच्या कारखान्यांना लागणारी यंत्रसामग्री व इतर साधने देशातच तयार करण्याची व्यवस्था होत आहे. देशात काही पिकांच्या बाबतीत हरितक्रांती झालेली आहे. इतर काही पिकांच्या बाबतीतही ती होऊ लागली आहे, अशी लक्षणे दिसत आहेत. परंतु ती घडवून आणण्याची मुख्य मदार रासायनिक खतांच्या पुरेशा पुरवठ्यावर अवलंबून आहे. खतांच्या कारखान्यांना आवश्यक असणाऱ्या साधनांच्या बाबतीत भारत अजून स्वयंपूर्ण झालेला नाही. अर्थात ह्या बाबतीत परदेशांवर अवलंबून राहणे धोक्याचे आहे. म्हणून देशांतर्गत उत्पादन वाढविण्याचे उपाय योजण्याची जरुरी अधिकच निकडीची झाली आहे. ह्याविषयी बोलतांना नियोजन मंत्री श्री. सुब्रह्मण्यम म्हणाले की खताची आयात दीर्घ काळपर्यंत चालू ठेवता येणार नाही म्हणून स्वतः कारखान्यांनी उत्पादनाच्या सुधारलेल्या पद्धती अंमलात आणून उत्पादन वाढविणे अतिशय अगत्याचे झाले आहे. खत कारखान्यांनी सध्यापेक्षा २ ते ३ लाख टन अधिक उत्पादन केले तर २५ कोटी ते ४० कोटी रुपयांच्या परदेशी चलनाची बचत होऊ शकेल. कारखान्यांची सध्याची म्हणजे १९७०-७१ मधील उत्पादन-क्षमता १० लाख टनापेक्षा थोडी अधिक आहे. पण, प्रत्यक्ष उत्पादन मात्र ८ लाख, ३० हजार टनाच्या जवळपास आहे. हे आकडे नत्रयुक्त खताबद्दलचे आहेत.

---

## उत्पादन वाढविण्यातील अडचणी

असोसिएशनचे अध्यक्ष श्री. डी. सी. कोठारी म्हणाले की खताचे जास्तीत जास्त उत्पादन झाले पाहिजे ह्यात शंकाच नाही. पण उत्पादन वाढविण्यात अनेक अडचणी आहेत. त्यांपैकी काही अशा सांगता येतील. विजेचा अपुरा पुरवठा, विजेच्या दाबात होणारे फेरबदल, कारखान्यांसाठी लागणारे सुटे भाग मिळण्यातील अडचणी, इत्यादी. सुपर फॉस्फेट तयार करणाऱ्या कारखान्यांतील उत्पादनक्षमता फारच कमी प्रमाणात वापरली जात आहे. त्यासाठी ह्या प्रकारचे खत वापरण्यास उत्तेजन देण्यात आले पाहिजे आणि परदेशांतील खतावर अवलंबून राहण्याचे टाळण्यात आले पाहिजे. असे केले तर ह्या खताच्या निर्मितीत अधिक उत्पादनक्षमता वापरात येऊ लागेल. त्याच बरोबर खताच्या वापराला अधिक प्रोत्साहन देण्यात आले पाहिजे. अलीकडे खताच्या वापराचे प्रमाण काहीसे कमी होऊ लागल्याचे दिसून येत आहे. तरीपण निराशा वाटण्यासारखी परिस्थिती नाही. शेतीविषयक नव्या संशोधनामुळे तांदूळ, डाळी, गळितीची धान्ये, रोखीची इतर पिके, ह्यांच्या बाबतीत क्रांती होण्याची चिन्हे दिसत आहेत. ही क्रांती यशस्वी झाली तर रासायनिक खतांच्या मागणीत एकदम मोठी वाढ होण्याची शक्यता आहे. खतांचा उठाव होण्यासाठी शेतकऱ्याला त्याच्या पतीवर कर्जाचा पुरवठा मात्र करण्यात आला पाहिजे. अलीकडेच करण्यात आलेल्या पाहणीवरून असे दिसून आले आहे की खतांच्या व्यापाराला बँकांकडून जशी मदत व्हावयास पाहिजे होती तशी होत नाही. राष्ट्रीयीकरण झाल्यानंतर ज्या अपेक्षा होत्या त्या पूर्ण झालेल्या नाहीत.

---

## रशिआमधून ज्यूंचे मोठे स्थलांतर

रशिआमधून इस्राइलमध्ये देशांतर करणारांची संख्या अलीकडे वाढू लागली आहे. त्यावरून ह्यासंबंधी रशिआच्या धोरणात बदल झालेला असावा असा तर्क करण्यात येत आहे. ज्यूंच्या आंतरराष्ट्रीय संघटना रशिआत ज्यू लोकांचा छळ करण्यात येतो अशा तक्रारी करीत असतात. तेव्हा ज्या ज्यू लोकांना रशिआतून बाहेर पडावयाचे आहे त्यांना तसे करण्याची परवानगी देण्यात येत असावी. इस्राइलच्या अधिकाऱ्यांचा असा अंदाज आहे की ह्या वर्षी रशिआतून ४० हजार ज्यू इस्राइलमध्ये येतील. प्रत्येक परागंदा होणाऱ्या ज्यूला रशिअन सरकार १०० डॉलर्स व आपले नेहमीचे सामानसुमान बरोबर घेऊन जाण्याची परवानगी देते. गेल्या वर्षाच्या अखेरीस रशिआने बाहेर पडू इच्छिणाऱ्या ज्यूंना मागील वर्षाच्या मानाने अधिक सरळ हाताने परवाने दिले. १९६९ च्या मानाने इस्राइलमध्ये येणाऱ्या रशिआतील ज्यूंची संख्या दुप्पट झाली आहे. तथापि इस्राइल देश कोणत्याही देशातील ज्यूंना सामावून घेण्यात तयार आहे असे मात्र नाही. इस्राइलमध्येही कृष्णवर्ण ज्यूंना नीट वागविले जात नाही अशा वार्ता येत असतात. युरोपमधील गोऱ्या रंगाच्या ज्यूंची आवक मात्र मोठ्या संख्येने व्हावी असे इस्राइल सरकारला वाटते. भारत अगर अरब देशातून येणाऱ्या ज्यूंना तेथील सरकार मानाने वागवीत नाही. इस्राइलमधील लोकांचे म्हणणे असे आहे की कृष्णवर्ण ज्यूंना गोऱ्या ज्यूंशी मिळून मिसळून वागणे जमत नाही. एकतर त्यांचा सांस्कृतिक दर्जा वेगळा असतो. शिवाय युरोपिअन ज्यू हा तांत्रिकदृष्ट्या अधिक पुढारलेला असण्याचा संभव असतो. अर्थातच त्याची आवक अधिक पसंत पडते. जगाच्या अनेक देशांतून इस्राइलला येणाऱ्या ज्यूंची संख्या वाढत चालल्यामुळे तेथील सरकारपुढे अनेक प्रश्न नव्याने उत्पन्न होत आहेत. नव्याने येणारांची व्यवस्था त्यांच्या दर्जाप्रमाणे लावणे अधिकाधिक कठीण होत चालले आहे.

**मनिऑर्डरचे फॉर्म तीन भाषांत** — मनिऑर्डरचे फॉर्म आता हिंदी, इंग्रजी आणि विभागीय भाषांत छापले जाणार आहेत.

**"वधू पाहिजे" जाहिरातीने एप्रिल फूल**— प्रोव्हो ( उटा, अमेरिका ) येथील एका विद्यापीठाच्या वृत्तपत्रात पुढील-प्रमाणे जाहिरात छापून आली. "वधू पाहिजे; अत्यंत तातडीने. अर्जंट. पूर्व अनुभवाची आवश्यकता नाही. डेव्हिड ब्रिगजशी संपर्क साधा. फोन नं. ३७५-४४१६". ब्रिगजच्या एका मित्राने हा उपद्व्याप केला होता. ब्रिगजला २१६ तरुणींकडून टेलिफोन-वरून विचारणा झाली !

**"ए भाई जरा देख के चालो"**— राजकपूर च्या 'मेरा नाम जोकर' मधील मन्ना डेचे हे गाणे थोडा बदल करून मुंबईमधील पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी प्रचाराकरिता वापरण्यात येण्याचा संभव आहे. कमिशनर ऑफ पोलिस, श्री. एस. जी. प्रधान यांनी ही माहिती दिली.

**लिंग निश्चित करण्यासाठी तपासणी** — १९७२ मध्ये म्युनिच येथील समर ऑलिंपिग गेम्स मध्ये भाग घेणाऱ्या स्त्रियांची लिंग-तपासणी करण्यासाठी त्यांचा केस उपटून घेऊन त्याच्या मुळाशी असलेल्या पेशी तपासल्या जातील. पूर्वी लाळ तपासीत असत.

**अमेरिकेला होणाऱ्या निर्यातीत वाढ**— गेल्या वर्षी भारत आणि अमेरिका ह्यांचे राजकीय संबंध खूपच बिघडलेले होते, शिवाय अमेरिकेतील बंदर-कामगारात पसरलेली संपाची लाट खूप वेळ टिकली होती तरीही १९७० च्या मानाने १९७१ साली भारताने अमेरिकेला अधिक माल निर्यात केला. १९७१ साली २४६.९ कोटी रुपये किंमतीच्या मालाची निर्यात करण्यात आली. ही निर्यात १९७० सालातील निर्याती-पेक्षा २३.३ कोटींनी अधिक आहे.

**खासदारांना प्रवास कर माफ**—इंडिअन एअर लाइन्सच्या प्रवक्त्याने अशी माहिती सांगितली आहे की लोकसभेच्या सभासदांना देशान्तर्गत केलेल्या हवाई प्रवासावरील कर माफ करण्यात आला आहे. एरव्ही प्रवाशांना १५ टक्के कर द्यावा लागतो. माफीची अमलबजावणी तात्काल करण्यात येऊ लागली आहे.


**इजिप्तची ब्रिटनला भेट** — इजिप्तमधील आस्वान धरण बांधल्यावर काही प्राचीन देवळे बुडण्याचा धोका होता. ही देवळे उचलून उंचावर नेण्यासाठी अनेक देशांनी मदत दिली होती. ब्रिटनने ७१ हजार पौंड दिले होते. या मदतीबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी इजिप्तने ब्रिटनला एक नक्षीदार फाटक भेट म्हणून दिले आहे. ते ४,५०० वर्षांपूर्वीचे आहे.





GADRE BROTHERS
ENGINEERS & FOUNDERS
MADHAVNAGAR (S. Rly.)
Phone: 318 Sangli
Gram : 'SEWA Madhavnagar





नाण्याला तीन बाजू असतात...
दोन नेहमीच्याच आणि तिसरी बाजू परीघ (जाडी)
युनायटेड वेस्टर्न बँकेत रक्कम गुंतविल्याने नाण्याचा परीघ वाढतो म्हणजेच रकमेत वाढ होते. आकर्षक व्याज दराच्या गरजेनरूप विविध ठेव योजना.
दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.
मुख्य कचेरी: चिरमुले निकेतन, राजपथ, सातारा.
स्थापना: १९३६ महाराष्ट्रांत सर्वत्र शाखा
वेस्टर्न इंडिया ट्रस्टी अँड एक्झीक्युटर कंपनी लि.

BANK TO BANK...

# THE BELGAUM BANK LIMITED

( SCHEDULED BANK )

*Regd. & Head Office* : 659–60, Raviwar Peth,
BELGAUM

Invest in our " Family Benefit Deposit Scheme " and earn Monthly Interest as a Pension – Enquire at any of our Branches – Bombay Office at Mandvi, Bombay – 9.

OUR MOTTO IS SERVICE
AND WE REALLY SERVE.

**S. Y. KAMAT**
*General Manager.*

**K. B. KIRTIKAR**
*Chairman.*

# ओगले

## प्रभाकर कंदील

◆ अंधाऱ्या रात्री,
◆ वादळी वाऱ्यात,
◆ ओवड-धोबड रस्त्यावर,
◆ खवळलेल्या दर्यावर

मार्गदर्शक व विश्वसनीय.

तयार करणार
ओगले ग्लास वर्क्स लिमिटेड
ओगलेवाडी ( जि. सातारा )

# दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

मुख्य कचेरी :
९ बँक हाऊस लेन,
फोर्ट, मुंबई १.

प्रादेशिक कचेरी :
महाल, नागपूर

| सांपत्तिक स्थिती | ३०–६–१९७१ रोजी |
|---|---|
| १. भांडवल व निधी | रु. १८८५ लाख |
| २. ठेवी | रु. ९३३२ लाख |
| ३. कर्जे | रु. १४१८९ लाख |
| ४. एकूण खेळते भांडवल | रु. १९५५१ लाख |

१. ठेवींवरील व्याजाचे आकर्षक दर.
२. सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.
३. देशातील सर्व प्रमुख ठिकाणी बिलवसुलीची व्यवस्था.
४. राज्यात १००० हून अधिक कचेऱ्या असणाऱ्या सहकारी पत-पुरवठा व्यवस्थेतील शिखर संस्था.

सामुदायिक हितासाठी सदैव झटणारी बँक

डॉ. धा. घु. श्रीश्रीमाळ
कार्यकारी संचालक

श्री. वसंतराव दादा पाटील
अध्यक्ष

| तारेचा पत्ता : "मॉर्गेज" | दूरध्वनी | मुख्य कार्यालय : २६७८० १/२/३ (३ लाईन्स) |
|---|---|---|
| | | कार्यकारी संचालक : २६१४९७ (डायरेक्ट लाईन) |
| | | उपकार्यालय नं.१: २६०३०६ नं.२: २९०००६ |

# दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह लँड डेव्हलपमेंट बँक लि.

जे. के. बिल्डिंग, २ रा माळा, नरोत्तम मोरारजी मार्ग,
बॅलार्ड इस्टेट, मुंबई नं. १.
( स्थापना १९३५ )

महाराष्ट्र राज्यातील २७ प्राथमिक भूविकास बँका या बँकेस संलग्न आहेत. बँकेने तगाई योजनेखाली विहिरी, ऑईल इंजिन्स, पंपिंग सेट्स्, इलेक्ट्रिक मोटर्स तसेच जमीनसुधारणेकरिता कर्ज-वाटपाचा व्यवहार हाती घेतला आहे. जून १९७१ अखेर बँकेचे भागभांडवल ८ कोटी ८७ लाख, गंगाजळी ६९ लाख, ऋणविमोचन निधीची गुंतवणूक ४५ कोटी व येणे कर्ज ११५·५५ कोटी आहे.

नी. आ. कल्याणी
अध्यक्ष

रा. गो. गोखले
व्यवस्थापक

जी. पी. भावे
कार्यकारी संचालक

हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं.९१५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८९१ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. ( वार्षिक वर्गणी रु. ९ )